वन विभागातंर्गत शासकीय कार्यक्रमांच्या आयोजनामध्ये राजशिष्टाचाराचे पालन करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन

महसूल व वन विभाग,

शासन परिपत्रक क्र. एमएफएस-२०१८/प्र.क्र.१७ /फ-८

मंत्रालय, मुंबई-३२

दिनांक ६ मार्च, २०१८

वाचा :-

१) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. विमंस-२०१३/प्र.क्र.६७/१८ (र.व का.) दि.१७/०१/२०१४

२) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. विमंस-२०१३/प्र.क्र.६७/१८ (र.व का.) दि.२७/०७/२०१५

३) शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग क्र. संकिर्ण २०१५/प्र.क्र.८१/१८(र.व का.) दि.१७/०४/२०१७

शासन परिपत्रक :-

शासकीय, निमशासकीय, पोलीस सेवेतील तसेच इतर नागरी सेवेतील अधिकारी/ कर्मचारी यांच्याकडून विधानमंडळ / संसद सदस्यांना दिल्या जाणाऱ्या अपमानास्पद तसेच अयोग्य वागणूकीबाबत विधानमंडळ / संसद सदस्यांकडून वारंवार तक्रारी प्राप्त होतात. विधान मंडळ सदस्यांना दिल्या जाणाऱ्या अवमानकारक वागणूकीची विधानसभा विशेष हक्क समितीने देखील यापूर्वी गंभीर दखल घेतली आहे. याअनुषंगाने विधानमंडळ/संसद सदस्यांना सन्मानाची व सौजन्याची वागणूक देणे, त्यांचेकडून आलेल्या पत्र / अर्ज / निवेदनांना पोच देणे / त्यावर सत्वर कार्यवाही करणे, शासकीय कार्यक्रमांना लोकप्रतिनिधींना आमंत्रित करणे त्यांचे नाव निमंत्रण पत्रिकेवर छापणे इ. बाबत सामान्य प्रशासन विभागाच्या संदर्भाधिन परिपत्रकान्वये वेळोवेळी मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. तथापि वन विभागांतर्गत शासकीय लोकोपयोगी / विकासात्मक कामांची उदघाटने/ भूमिपूजन / पाया भरणी / शुभारंभ / कार्यशाळा आयोजन व इतर अनुषंगिक कार्यक्रमाच्यावेळी राजशिष्टाचाराचे पालन होत नसल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आलेली आहे.

यास अनुलक्षून वन विभागांतर्गत सर्व क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात येते की, त्यांनी यासंदर्भात सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचनांचे काटेकोर पालन होईल याची दक्षता घ्यावी. तसेच वन विभागांतर्गत शासकीय लोकोपयोगी / विकासात्मक कामांची उदघाटने/ भूमिपूजन

/ पाया भरणी / शुभारंभ / कार्यशाळा आयोजन व इतर अनुषंगिक कार्यक्रमाच्यावेळी राजशिष्टाचाराचे पालन होईल याची दक्षता घ्यावी.

वन विभागांतर्गत विविध कार्यक्रमाच्या आयोजनापुर्वी कार्यक्रमाची पार्श्वभुमी,रूपरेषा व तद्अनुषंगिक तयारी याबाबतची वस्तुस्थिती मा. मंत्री (वने) तसेच मा. राज्यमंत्री (वने) यांच्या निदर्शनास आणून द्यावी तसेच कार्यक्रमाचे आयोजनामध्ये त्यांनी दिलेल्या सूचनांची काटेकोरपणे अमंलबजावणी करावी.

भविष्यात वन विभागातंर्गत विविध शासकीय कार्यक्रमाच्या आयोजनाच्या अनुषंगाने राजशिष्टाचाराचे पालन करण्यात उणिव निदर्शनास आल्यास संबंधीत अधिकाऱ्यांवर तात्काळ शिस्तभंग विषयक कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

सदर शासन आदेश, महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून, त्याचा संकेतांक २०१८०३०६१६००५६०२१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Atul Ashok Kode

Digitally signed by Atul Ashok Kode
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=a12403ed93b05957cb29b7e95265d3ac52d366233b80405514f23a879132aeec, serialNumber=f0d5ee4c99cc9cbfa8761b3ddc7bd6650bad33302f33a35400ad5aad2291371a, cn=Atul Ashok Kode
Date: 2018.03.06 16:03:47 +05'30'

(अतुल कोदे)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :

१. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वनबल प्रमुख), महाराष्ट्र राज्य, नागपूर
२. प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन्यजीव), महाराष्ट्र राज्य, नागपूर
३. प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र वन विकास महामंडळ मर्या. नागपूर
५. व्यवस्थापकीय संचालक, जैवविविधता मंडळ, नागपूर
६. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (सर्व),
७. मुख्य वनसंरक्षक (सर्व),
८. उप वनसंरक्षक (सर्व), / विभागीय वन अधिकारी (सर्व) / उपविभागीय वन अधिकारी (सर्व)
९. खाजगी सचिव, मा. मंत्री (वने)
१०.खाजगी सचिव, मा. राज्यमंत्री (वने)
११. वन विभागातील सर्व कार्यासने
१२.निवडनस्ती फ-८